# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

राज्यातील ग्रामीण भागातील गरीबीचे निर्मुलन करण्यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोंनती अभियानाची सुरुवात सन २०११ मध्ये केली. महाराष्ट्र राज्यात सदरील अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामविकास विभांगांतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोंनती अभियान या स्वतंत्र संस्थेची स्थापना संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये करण्यात आलेली आहे. सदरील अभियानाची अंमलबजावणी राज्यातील ३४ जिल्हे व ३५१ तालुक्यातील पुर्ण ताकदीने अभियान राबविले जात आहे.

महाराष्ट्र राज्यातील ७१ लक्ष गरीब कुटुंबांना शाश्वत उपजीविकेच्या माध्यमातून गरिबीतून बाहेर काढण्यासाठी अभियान कटीबद्ध आहे. या करीता समुदाय संघटन, गरिबांच्या गरीबांनी निर्माण केलेल्या बळकट समुदायस्तरीय संस्थांची निर्मिती, विविध पथदर्शी प्रकल्प, स्वयंसेवी व शासकीय तसेच खाजगी संस्थासोबत भागीदारी अद्यावत मनुष्यबळ संसाधन विकास पद्धती, शाश्वात उपजीविकेचे स्तोत्र उभे करण्याकरिता अभियानामार्फत तसेच विविध वित्तय संस्था व बँकांच्या माध्यमातून वेळेवर, किफायत व्याज दराने व नियमित वित्त पुरवठा, कृतीसंगमांच्या माध्यमातून विविध शासकिय योजनांचा गरीब कुटुंबांना लाभ मिळविण्याकरिता समुदायस्तरीय संस्थांची क्षमता बांधणी करणे, अशा अनेक नाविन्यपूर्ण व परिणामकारण पद्धतीने अभियानाची अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे.

## सामाजिक समावेशन व संस्था बांधणी

भारतात अजूनही बहुसंख्य जनता ग्रामीण भागामध्ये वास्तव्य करीत असून बेरोजगारी व गरीबीचे प्रमाण ग्रामीण भागात सर्वाधिक आहे. ग्रामीण गरीब कुटुंबांची गरिबी दूर करण्यासाठी वैविध्यपूर्ण व फायदेशीर


शेती/ बिगरशेती क्षेत्रातील उत्पन्नाची साधने उपलब्ध करून देणे व रोजगार आणि वेतनासाठी संधी उपलब्ध करून देणे यासाठी गरिबी निर्मूलनाचे विविध उपक्रम राबविणे हे उमेद अभियानाचे प्रमुख उद्दीष्ट आहे. याकरिता राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियामानाध्ये ग्रामीण गरीब कुटुंबातील महिलांना संघटीत / एकत्रित करून त्यांची रचनात्मक संस्थीय बांधणी करण्यात येतआहे.

## सामाजिक समावेशन

महाराष्ट्रातील ७१ लक्ष कुटुंबाना एकत्रित व संघटीत करून त्यांच्या स्वत:च्या स्वयंचलित संस्था निर्माण करणे हा 'उमेद' अभियानाचा मुख्य हेतू आहे.या संस्थाच्या माध्यमातून गरीब कुटुंबातील महिलाना संघटीत करून शाश्वत रोजगार/उपजीविका (शेती, शेती पूरक व बिगर शेती इ.ठिकाणी रोजगार) उपलब्ध होण्याकरिता प्रयत्न करण्यात येत आहेत.

प्रत्येक गरीबातील गरीब कुटुंबातील किमान एक महिला संस्थीय रचनेमध्ये (स्वयंसहाय्यता गट,ग्रामसंघ व प्रभागसंघाला) जोडण्यात येते. सन २०११ मधील सामाजिक, आर्थिक, जातनिहाय(SECC) सर्वेक्षणयादीतील पात्र १००% कुटुंब व यादीमध्ये नसलेल्या गरीब कुटुंबांचा सहभागी पद्धतीने शोध (PIP- Participatory Identification of Poor) घेऊन या कुटुंबांचे समावेशन करणेकरिता स्वयंसहाय्यता समूहाची (SHG) स्थापना करण्यात येते.समावेशन करताना लक्ष घटकांच्या स्वयंसहाय्यतासमूहांची (SHGs) स्थापना हा पहिला टप्पा होय. स्वयंसहायता समूह स्थापनेनंतर गाव / ग्रामपंचायतस्तरावर ग्रामसंघ व प्रभाग स्तरावर प्रभागसंघ अशा पद्धतीने ग्रामीण गरीब कुटुंबांची त्रिस्तरीय संस्थीय बांधणी करण्यात येत आहे.

# समुदायस्तरीय संस्थांची त्रिस्तरीय संरचना




## सहभागीदार

गावपातळीवरील संस्थाची स्थापना व उमेद अंतर्गत सर्व उपक्रम अंमलबजावणी करताना समुदायस्तरीय संस्था सर्व ग्रामीण गरीब कुटुंबांचा सहभाग घेतील. ग्रामीण गरीब कुटुंबांच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेमध्ये सर्व सहभागीदार यंत्रणा (ग्रामपंचायत, आरोग्य , शिक्षण असे व अन्य सर्व शासकिय निमशासकीय विभाग व यंत्रणा), सामाजिक संस्था इ. चा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे. कार्यरत त्रिस्तरीय समुदाय संस्थांमध्ये खालील मुल्यांचा समावेश असेल.

## पारदर्शकता

संस्था, गट व अभियानामार्फत निर्देशित कार्यक्रम/उपक्रमांची अंमलबजावणी करतानापारदर्शकता ठेवणे अपेक्षित असते.

- संस्थेची स्थापना झाल्यावर संस्थेची सर्व मुलभूत माहिती DAY - NRLM Portal वर नोंदविण्यात येते.
- संस्थेची माहिती संबंधित शासकीय विभाग, बँका, नोंदणी अधिकाऱ्यांना आवश्यकतेनुसार देण्यात येते.
- अंतर्गत व बाह्य लेखापरीक्षणाची माहिती , प्रगती अहवाल प्रभागसंघ संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व सदस्यांना दिली जाते.

## संवेदनशीलता

- संस्थेद्वारे आजपर्यंत दुर्लक्षित , वंचित , बेघर , भूमीहीन , विधवा , परितक्त्या , दिव्यांग , आदिवासी , आदिम जमाती ( PVTG ) , दुर्धर आजाराने पिडीत , वृद्ध कुटुंबांचा / घटकांचा शोध घेऊन त्यांना सहाय्य केले जाते.
- अभियानाचा निधी, बाह्य संस्थांद्वारे प्राप्त होणारा निधी प्राधान्याने लक्षघटकाला उपलब्ध करून देण्यात येतो.

## उमेद अंतर्गत कार्यरत समुदायस्तरीय संस्थां खालीलप्रमाणे आहेत :-

### १. स्वयंसहाय्यता समूह ( SHG ) :-

कुटुंबांचे दारिद्य दूर करून सन्मानाचे जीवन जगण्याच्या उद्देशाने एकाच गावामध्ये राहणरी आणि समान सामाजिक, आर्थिक परिस्थितीत असणारी १० ते १५ गरीब कुटुंबेमहिला एकत्र येवून दशसुत्री नियमावलीच्या आधारे समूह तयार करतात त्यास स्वयंसहाय्यता समूह असे म्हणतात.


गावात गट तयार करताना प्राधान्याने सुरुवात ही गरीब, वंचित घटकांपासून म्हणजेच अनुसूचित जाती, जमाती, अल्पसंख्याक, विधवा,परित्यक्त्या, एकल, दिव्यांग, तृतीयपंथी, दिव्यांग कुटुंबातील महिला या पासून

केली जाते. स्व-विकास/सक्षमीकरणकरताना गटातील सर्व महिलांच्या सर्वांगीण (कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय) विकासाच्या हेतूने प्रेरित महिला एकत्र येऊन समूह स्थापन करतात.

**अभियानाचे व पर्यायाने समुदायस्तरीय संस्थांचे लक्ष घटक**




**स्वयंसहाय्यता गटाचे फायदे:**




**स्वयंसहाय्यता समूहाचे कार्यक्षेत्र** :

एका ग्रामपंचायती अंतर्गत येणारे गाव, वाडी, वस्ती, पाडा, टोला, तांडा, मळा, मोहल्ला, गल्ली हे समूहाचे कार्यक्षेत्र असेल. या कार्यक्षेत्रातील १०-१५ कुटुंबांचा एका स्वयं सहाय्यता समूहातसमावेश केला जातो. दिव्यांग,तृतीयपंथी,वयोवृद्ध कुटुंबांना मिश्र गटाच्या माध्यमातून अभियानाशी जोडण्यात येतात. हे गट ५ ते ७ सदस्यांचे मिश्र गट असतात


**दशसुत्री**:

स्वयंसहाय्यता गटांसाठी नियमावली म्हणून दशसुत्रीचे नियम करण्यात आलेले आहेत.

**धनव्यवहार**





**मनव्यवहार**




## २. ग्रामसंघ ( VO ) :

गाव पातळीवरील सर्व गटांच्या समस्या सोडविण्यासाठी एखादा गट पुरेसा ठरत नाही. परिणामी सर्वांनी मिळून संघटीतरित्या समस्या सोडविण्यासाठी व्यापक सामुहिक संघटनेची गरज असल्याने तेथे सर्व महिला स्वयंसहाय्यता गटांच्या सहभागातून गाव/ग्रामपंचायतपातळीवर ग्रामसंघाची (Village Organisation-VO) स्थापना करण्यात येते .याकरिता ग्रामपंचायत हे कार्यक्षेत्र असते. १५० ते २०० महिला एकत्र आल्यानंतर त्यावर शासकीय/निम शासकीय यंत्रणाना संबधित समस्येचे समाधान करणे सोपे जाते.

**ग्रामसंघ संरचना :-**




**ग्रामसंघाचे कार्यक्षेत्र**

ग्रामसंघ स्थापन होताना किमान ६ गटांची आवश्यकता असते. एका ग्रामसंघात कमीतकमी सहा आणि जास्तीत जास्त २५ ते ३० गट असतात. जर गाव खूप लहान असेल आणि ग्रामसंघ स्थापन करताना पाच गट नसतील तर शेजारील गावातील पात्र असणाऱ्या गटांचाही समावेश करून ग्रामसंघ तयार करता येऊ शकतो.ग्रामपंचायत व ग्रामपंचायतीमधील महसुली गाव हे ग्रामसंघाचे कार्यक्षेत्र असेल.


## ३. प्रभागसंघ ( CLF )

एका प्रभागाने गरिबी निर्मूलनाच्या कार्यकक्षेत समावेशन व त्यासाठी प्रयत्न/उपयोजना करणे अपेक्षित आहे तरच तालुका/जिल्हा पर्यायाने गरिबी मुक्त होईल.ही कामे व्यापक स्वरुपात पाहताना ग्रामसंघामध्ये गटांची सदस्यता संख्या पाहता त्यांचे कार्यक्षेत्र व सदस्य संख्या याला मर्यादा असल्याचे दिसून येते. याकरिता एका प्रभागातील सर्व ग्रामसंघांच्या सहभागातून प्रभागसंघ या शिखर संस्थेची स्थापना करण्यात येते.

अभियानांतर्गत विविध स्तरावर विविध योजना, कार्यक्रमाचे आयोजन व कृतीसंगम करण्यात येत आहे. प्राधान्याने गटांना विमा प्राप्त करून देणे,FarmersProducerOrganisations (FPOs) तयार करून विविध शेती, बिगर शेतीविषयक उद्योग निर्माण करणे, विविध शासकीय योजना जसे MGNREGS, दिव्यागांशी संबधित योजना, महिला व बाल विकास तथा पोषण विषयक योजना राबविण्यात येत आहे. प्रभागसंघ ही संस्था या सर्व योजना व सेवांना प्रभागपातळीवर एकत्रित करून आवश्यक तो समन्वय साधून सर्व योजनांचा प्रचार व प्रसार करून प्रत्येक गरजू सदस्य/कुटुंबाना या योजनांशी जोडण्याचा प्रयत्न करेल. जेणेकरून सर्व योजना व सेवा प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहचू शकेल.

**प्रभागसंघाचे कार्यक्षेत्र**
२० ते २५ गावे व त्यामधील सर्व ग्रामसंघ हे प्रभागसंघाचे कार्यक्षेत्र आहे.

**प्रभागसंघाची रचना**




**प्रभागसंघाचा उद्देश**

१) एका प्रभागातील सर्व ग्रामसंघाना प्रभागपातळीवर एकत्रित करून प्रभागसंघ निर्माण करण्याची आवश्यकता आहे, जेणेकरून प्रभागस्तरावर विविध कामांचे व्यवस्थापन व विकास सामुहिक संघटनात्मकरित्या करता येतो.

२) प्रभागसंघ ग्रामसंघाना मार्गदर्शक, त्यांचे सनियंत्रण व क्षमता बांधणी करण्याच्या भूमिकेत काम करतो .

३) विविध शासकीय तथा निमशासकीय संस्था, खाजगी संस्था तसेच Producer Group च्या माध्यमाने राबविण्यात येणाऱ्या उपजीविकांच्या योजनांकरिता प्रभागस्तरावर एकत्रित करण्याचा व समन्वय करण्याचा प्रयत्न केला जातो. ज्यामुळे अधिकाधिक गरजू महिला/कुटुंबाना शाश्वत उपजीविकेकडे नेता येते.

## आर्थिक समावेशन म्हणजे काय ?

आर्थिक समावेशन म्हणजे देशातील वंचित व अल्प उत्पन्न गटातील जनतेला कमी खर्चात बँकिग सेवा उपलब्ध करून देणे होय.

## आर्थिक समावेशनची आवश्यकता का आहे ?

ग्रामीण भागामध्ये बँकेची भूमिका सक्रीय करणे

आर्थिक साक्षरता व शिक्षण प्रदान करणे

बँकेच्या सेवाकरिताचा जास्तीचा खर्च व वेळ कमी करणे

शाश्वत उपजीविका प्रदान करणे

## आर्थिक समावेशनचे महत्वाचे घटक

## बँक पतपुरवठा

**बँक पतपुरवठा म्हणजे ?**

स्वयंसहायता समूहांचे खाते सार्वजनिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, सहकारी व खाजगी बँका यामध्ये काढून त्यांना रिजर्व बँक ऑफ इंडिया यांच्या नियमाप्रमाणे कर्ज पुरवठा प्राप्त करून देणे.

रिजर्व बँक ऑफ इंडिया यांच्या नियमानुसार स्वयंसहायता समूहाला प्राप्त होणारी कर्ज मर्यादा

| **अनु.क्र** | **बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाचा तपशील** | **कर्ज मर्यादा** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | समूहाला बँकेकडून मिळणारे पहिले कर्ज | बचतीच्या ६ पट किंवा १.५ लक्ष यापैकी जे अधिक असेल ते |
| २. | दुसरे कर्ज | बचतीच्या ८ पट किंवा ३ लक्ष यापैकी जे अधिक असेल ते |
| ३. | तिसरे कर्ज | प्रकल्प आराखड्याच्या किमतीनुसार किंवा किमान ६ लक्ष |
| ४. | चौथे कर्ज | प्रकल्प आराखड्याच्या किमतीनुसार किंवा किमान ६ लक्ष यापैकी अधिक |

## मिशन एक ग्रामपंचायत एक BC सखी

ख विरहित (Digital Transaction) आर्थिक व्यवहाराला प्रोत्साहन देण्याकरिता आजीविका विभाग. ग्रामविकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्फत "मिशन एक ग्रामपंचायत एक BC सखी" ही संकल्पना राबविण्यात येत आहे.

**BC सखी द्वारे ग्रामीण भागामध्ये पुढील सेवा देण्यात येतात** :-

१. वैयक्तिक व स्वयंसहाय्यता समूह यांचे बँक खाते उघडणे

२. बँक खात्यावर रक्कम जमा करणे अथवा रक्कम काढणे

३. पात्र सदस्यांना विमा व पेन्शन योजनेमध्ये समाविष्ट करून घेणे

४. विविध प्रकारचे बिल भरणा करणे

## आर्थिक समावेशन समुदाय संसाधन व्यक्ती (CRP)

## सामाजिक सुरक्षा योजना

स्वयं सहाय्यता समूहातील सदस्य व त्यांच्या कुटुंबियांना जोखीम व्याप्ती प्राप्त व्हावी याकरिता त्यांना सामाजिक सुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट करण्यात. तसेच योजनेचा लाभ घेतल्यानंतर काही दुर्घटना घडल्यास क्लेम प्राप्ती करिता सहकार्य करण्यात येते. होणारी कर्ज मर्यादा

## प्रधानमंत्री जीवनज्योती बिमा योजना (PMJJBY)

- **पात्रता** : बचत बँक खातेधारकाचे वय १८ वर्ष (पूर्ण) ते ५० वर्ष पर्यंत असावे.
- **विमा कालावधी** : एक वर्ष
- **विमा रक्कम** : रु.४३६/- प्रती वर्ष
- **विमा रक्कम भरण्याची पद्धत** : बँकेद्वारे ग्राहकाच्या बचत बँक खात्यातून थेट स्वयं भरणा.
- **विमा संरक्षण** : २ लाख रुपये. नैसर्गिकरित्या मृत्यु झाल्यास नामांकित व्यक्तीला मिळते.

## प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना (PMSBY)

- **पात्रता** : बचत बँक खातेधारकाचे वय १८ वर्ष (पूर्ण) ते ७० वर्ष पर्यंत असावे.
- **विमा कालावधी** : एक वर्ष
- **विमा रक्कम** : रु.२०/- प्रती वर्ष
- **विमा रक्कम भरण्याची पद्धत** : बँकेद्वारे ग्राहकाच्या बचत बँक खात्यातून थेट स्वयं भरणा.
- **विमा संरक्षण** : अपघाती मृत्यू झाल्यास अथवा पूर्णतः Disability आल्यास रुपये २ लाख. तर Partial Disability आल्यास रुपये १ लाखाचे विमा संरक्षण प्राप्त होते.

## अटल पेन्शन योजना (APY)

- **योजनेचा लाभ** : प्रतिमाह ग्राहकांसाठी रुपये 1,000/- ते 5,000/-
- **पात्रता** : वय 18 वर्ष (पूर्ण) ते 40 वर्ष
- **योगदान** : रु. 42/- ते 1,454/- नोंदणीच्या वेळी असलेले वय व ग्राहकाला आवश्यक असलेली मासिक पेन्शन यावर अवलंबून आहे. योगदानाचा किमान कालावधी 20 वर्ष व त्यापेक्षा जास्त राहील.
- **पॉलीसीचा प्रीमिअम भरण्याची पद्धत** : बँकेद्वारे ग्राहकाच्या बचत बँक खात्यातून थेट स्वयं भरणा.
- **पेन्शन प्राप्ती** : मासिक पेन्शनची प्राप्ती ग्राहकाला 60 वर्ष पूर्ण झाल्यावर अथवा ग्राहकाचा मृत्यू झाल्यास पती किंवा पत्नीला होईल. त्यांच्या मृत्युनंतर पेन्शन संचय रक्कम ग्राहकाने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीला दिला जाईल.

## सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना




राष्ट्रीय राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या व केंद्र शासनाकडून व्याज अनुदान प्राप्त झालेल्या पात्र महिला स्वंयसहाय्यता समूहांना सवलतीच्या व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी दि. १४ ऑक्टोबर २०१६ पासून सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना राबविण्याबाबत येत आहे.

- **योजनेचे उद्दिष्ट** : महिला स्वंयसहाय्यता समूहांना प्रभावी ०% व्याजदरानी कर्ज पुरवठा करणे.
- **पात्र स्वंयसहाय्यता समूह** :

१. नियमित कर्जफेड करणारे महिला स्वयंसहायता समूह
२. केंद्रशासनाकडून व्याज अनुदानास पात्र असलेले NRLM Compliant
३. महिला स्वंयसहाय्यता समूह

| **सध्यस्थिती** | | **प्रगती** |
|---|---|---|
| एकूण | समूह | १,४६,१२० |
| व्याज अनुदान रक्कम २९.०१ कोटी | | |

## क्षमता बांधणी

'गरीबांना गरीबीतून बाहेर पडण्याची तीव्र इच्छा असते'. पंरतु त्यासाठी त्यांना पोषक वातावरणाची निर्मिती करणे आवश्यक आहे. हे सुत्र लक्षात घेऊन केंद्र शासनाने दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची सुरवात केली. या अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी 'उमेद'- अर्थात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आलेली आहे.

अभियानामध्ये ग्रामीण महाराष्ट्रातील गरीब व जोखीम प्रवण कुटुंबांना समृध्द , आत्मसन्मानाने व सुरक्षित जीवन जगता यावे, यासाठी त्यांच्या सर्वसावेशक, लोकशाही तत्वावर आधारित स्वयंचलित समुदाय संस्थांची निर्मिती करुन त्यांचे अधिकार व हक्क, विविध वित्तीय सेवा, तसेच शाश्वत उपजीविकेच्या संधी प्राप्त होण्याच्या दृष्टीने पोषक वातावरणाची निर्मिती करण्यासाठी उमेद मार्फ़त प्रयत्न करण्यात येत आहेत. या मध्ये गावांमध्ये गरीब महिलांचे स्वयं सहाय्यता गट, स्वयं सहाय्यता गटांचे ग्रामपंचायत स्तरावर ग्राम संघ व जिल्हा परिषद प्रभाग़ स्तरावर प्रभाग संघांची तसेच महिला शेतकरी उत्पादक कंपनी, उत्पादक गटांची निर्मिती करण्यात येत आहे. या गरीबांच्या संस्थांना दैंनदिन सुलभिकरणासाठी गावास्तरावर प्रशिक्षित समुदाय संसाधन व्यक्तींची फ़ळी निर्माण करण्यात आलेली आहे.

## क्षमता बांधणीचे उद्देश


- ग्रामीण भागातील अभियानात सहभाग़ी महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय दृष्ट्या सक्षम करणे.

- कौटुंबिक व समुदाय स्तरीय निर्णय प्रक्रियेच्या मुख्य प्रवाहात महिलांचा प्रभावी सहभाग वाढविणे.
- गरीबांच्या समुदायस्तरीय सर्वसावेशक, लोकशाही तत्वावर आधारित स्वयंचलित संस्थांची निर्मिती करुन त्या संस्था सक्षम करण्यासाठी संस्था व्यवस्थापनाचे कौशल्य विकसित करणे.
- महिला व संस्थामध्ये आर्थिक साक्षरता वाढविणे आणि आर्थिक व्यवस्थापनाचे कौशल्य विकसित करणे.
- शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करणे व उपजीविकेतील संभाव्य धोके टाळण्यासाठी रणनिती आखण्याचे कौशल्य विकसित करणे.

- संवाद, नेतृत्व, लेखा व्यवस्थापन, समन्वय इत्यादी कौशल्य विकसित करणे-

## क्षमता बांधणीचे धोरण-



| | मोड्युलची माहिती |
|---|---|
| SM1 | स्वयंसहाय्यता गटाचे मुलभुत प्रशिक्षण |
| SM1 फिल्पचार्ट | स्वयंसहाय्यता गटाचे मुलभुत प्रशिक्षण |
| SBKM1 | स्वयंसहाय्यता गटाच्या हिशोबनिसाचे मुलभुत प्रशिक्षण |
| SM2 | आर्थिक साक्षरता आणि फिरता निधी |
| VM1 | ग्रामसंघ सदस्यांसाठी मुलभुत प्रशिक्षण |
| VBKM1 | ग्रामसंघ लिपिकेसाठी मुलभुत प्रशिक्षण |
| ग्रामसंघ उपसमिती प्रशिक्षण | ग्रामसंघाच्या उपसमितीचे प्रशिक्षण |
| VM2 | ग्रामसंघाच्या पुढील ५ वर्षाचे नियोजनाची तयारी |
| ग्रामसंघ व प्रभागसंघ पोस्टर सेट | ग्रामसंघ व प्रभागसंघ रचना |
| CLFM 1 | प्रभागसंघ सदस्यांसाठी मुलभुत प्रशिक्षण |
| VO Monitoring Sub Committee | ग्रामसंघातील सर्व व्यवहारांचे व निर्णय प्रक्रियेचे सनियंत्रण करने |
| Social Audit & Livelihoods Promotion Sub Committee | MIP मध्ये दिलेल्या नियोजननानुसार उत्पन्न, उद्योग साधने व मालमत्ता पाठपुरावा |
| Bank Linkage Committee | बँकेच्या संदर्भातील कामाचा पाठपुरावा व समन्वय |
| Social Action Committee | सामाजिक मुद्दे, समस्या विषयी सदस्यांमध्ये जाणीव जागृती, संवेदनशीलता निर्माण करणे |
| CrM1 | अंतर्गत समुदाय संसाधन व्यक्तीचे मूलभूत प्रशिक्षण |

| | **मोड्युलची माहिती** |
|---|---|
| CTC | समुदायस्तरीय प्रशिक्षकांचे मूलभूत प्रशिक्षण |
| PIP CRP | निवड करण्यात आलेल्या PIP CIP यांचे प्रशिक्षण |
| | गाव पातळीवर PIP प्रक्रिया |


## उपजीविका विभाग –

**कृषीसंबंधित आणि कृषी आधारित उपक्रम-**

## 1. राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (NRLM)

**कार्यपद्धती**:


ग्रामीण भागातील महिलांची शाश्वत उपजीविका वृद्धिंगत करणेसाठी राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (NRLM) या प्रकल्पाच्या माध्यमातून शाश्वत शेती, पशूपालन, मत्स्यपालन, प्रक्रिया उद्योग याकरिता व्यक्तिगत व सामुहिक उपजीविका उपक्रमाच्या विकासातून उत्पन्न वाढीसाठी तांत्रिक मार्गदर्शन व अर्थसहाय्य करण्यात येते.



## 2. राष्ट्रीय ग्रामीण आर्थिक परिवर्तन प्रकल्प (NRETP)

१५ जिल्ह्यातील ५५ तालुक्यात कृषी व कृषी संलग्न उद्योग व्यवसायाची व्याप्ती वाढविण्यासाठी मूल्यवर्धन साखळीमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी उत्पादक गट , महिला शेतकरी उत्पादक कंपनी (FPC/PE) , सेंद्रिय शेतीला चालना देणेसाठी सेंद्रीय शेती प्रभाग स्थापन करून. ग्रामीण कुटुंबांच्या सध्याची उपजिविका बळकट करणेसाठीचे उपक्रम ग्राम संघ , प्रभाग संघ यांचे मार्फत राबविले जातात.

## NRETP प्रकल्प अमलबजावणी समुदाय संस्था :



## एकात्मिक शेती प्रभाग विकास प्रकल्प

८ जिल्हे, १६ तालुके, ५३ IFC प्रभाग मंजूर आहेत १००% केंद्र पुरस्कृत

**प्रकल्प उद्धीष्ट-** जवळच्या २-३ गावातील ३०० कुटुंबे ज्यांच्याकडे २-३ उपजीविका उपक्रमात समाविष्ट आहेत असा एक IFC प्रभाग तयार करणे व वैविध्यपूर्ण उपजीविकेच्या उपक्रमांमध्ये सुधारणा, विस्तार व मूल्य साखळी विकसित करणे.

**योजना / प्रकल्प/ संकल्पना –** 3. महिला किसान सशक्तीकरण परियोजना (MKSP)

प्रकल्पात २० जिल्हयातील १३९ तालुक्यात राबविली जात असून महिलांना शेतकरी दर्जा प्राप्त करून देणे, त्यांना कृषि व पशुपालन विषयक शाश्वत शेती, बकरीपालन, व परसातील कुक्कुटपालन इ. विविध संधी निर्माण करणेसाठी मार्गदर्शन केले जाते. परियोजनेचा कालावधी माहे जून २०१६ ते डिसेंबर २०२२ पर्यंत आहे.

गाव स्तरावर उपजीविकेचे विविध सुविधा उपलब्ध करण्यासाठी ग्राम संघ व प्रभाग संघ, महिला शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करून त्यांना अर्थसहाय्य व कृतीसंगमच्या माध्यमातून शासनाच्या इतर योजनांचा लाभ मिळवून देण्साठी मार्गदर्शनातून प्रात्यक्षिक प्लॉट तयार करणे,संकलन केंद्र उभारणे ,शेती अवजार बँक स्थापन करणे,महिला शेतकऱ्यांची शेती शाळा घेणे ,विविध संस्थाच्या माध्यमातून महिला शेतकर्याकरिता तांत्रिक प्रशिक्षणासाठी नियाजन करणे इ.उपक्रम राबविले जातात.

## सेंद्रिय शेती उपक्रम

मोठ्या प्रमाणावर सेंद्रिय शेतीला चालना देणेसाठी राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (NRLM), राष्ट्रीय ग्रामीण आर्थिक परिवर्तन प्रकल्प (NRETP), महिला किसान सशक्तीकरण परियोजना (MKSP) सेंद्रीय शेती प्रभाग समाविष्ट करण्यात आलेले आहेत.अभियानाच्या माध्यमातून २६ जिल्ह्यात २७७ प्रभाग तयार केले आहेत. सध्यस्थितीत २७०० महिला शेतकर्यांची ३००० एकर क्षेत्र PGS Organic प्रमाणित झाले आहे. यासाठी केंद्र शासनाने नेमूण दिलेल्या तांत्रिक सहाय्य संस्थांची मदत घेतली जाते. यामध्ये खालील प्रमाणे कार्यपद्धती चा अवलंब करण्यात येते आहे.

## मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट)

जागतिक बँक अर्थासहाय्यीत स्मार्ट प्रकल्प राज्यात सन २०१९ पासून राबविण्यात येत असून महाराष्ट्र राज्य ग्रामीणजीवनोन्नती अभियानही एक स्वतंत्र प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा आहे. लहान आणि सिमांत शेतकरी तसेच नव उदयोजकांना केंद्र स्थानी ठेवून शेतमालाच्या सर्व समावेशक आणि स्पर्धात्मक मूल्य साखळीचा विकास करणे हा प्रकल्पाचा मुख्य उदेश आहे.

## कॉल फॉर प्रपोजल–

यामध्ये प्रक्रिया उद्योग,गोदाम, प्रतवारी यंत्र, शितगृह आदी बाबींचा समावेश आहे. शेतमाल प्रक्रिया उद्योग करिता अधिकतम अनुदान मर्यादा रक्कम २ कोटी आणि फलोत्पादन उद्योग करीता रुपये ३ कोटी अनुदान मर्यादा असून प्रकल्पातुन ६०% आणि समुदाय आधारित संस्थाचा स्वहिस्सा ४०% आहे. या करिता नोंदणीकृत व पात्र प्रभाग संघ / महिला शेतकरी उत्पादक कंपनी याना प्रोतसाहित करण्यात येत आहे.

## ब्रीज टेक्निकल सपोर्ट

या घटकांतर्गत राज्यातील MSRLM अंतर्गत स्थापन ग्रामीण महिलांचे प्रभाग संघ तसेच मावीम अंतर्गत स्थापन लोक संचालित साधन केंद्र यांच्या ४०० महिला शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्याचे कार्य सुरू असून पुढील २ वर्षात पूर्ण होईल.

## FORMATION AND PROMOTION OF 10,000 FARMER PRODUCER ORGANIZATIONS

शेतीच्या शाश्वत विकासासाठी आणि कृषी समुदयांच्या सर्वांगीण सामाजिक, आर्थिक विकास आणि कल्याणासाठी (Ministry of of Agriculture & Farmers Welfare) केंद्रशासन निर्देशाप्रमाणे नवीन १०,००० FPOs निर्मिती करण्याचे उदेश आहे.

सदर प्रकल्प केंद्र पुरस्कृत असून २५ महिला शेतकरी उत्पादक कंपनीला केंद्र शासनाकडून अर्थ सहाय्य होणार आहे. MSRLM- Cluster Based Business Organization म्हणून काम करत आहेत.

२५ महिला शेतकरी उत्पादक कंपनी यांना कार्यक्षम,किफायतशीर आणि शाश्वत संसाधानांच्या वापराद्वारे उत्पादकता वाढवणे, FPO चे व्यवस्थापन,निविष्टा,उत्पादन,प्रक्रिया,मूल्यवर्धन साखळी विकास,मार्केट लिंकेज ,क्रेडिट लिंकेजआणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी महिला शेतकऱ्यांमध्ये प्रभावी क्षमता निर्माण केली जात आहे.

या सर्व बाबींमध्ये FPO निर्मितीच्या वर्षापासून पुढील ५ वर्षांपर्यंत नवीन FPO ला Handholding Support प्रदान करण्यात येणार आहे .

## बिगर शेती उपजीविका

MSRLM ने शेती आणि शेती संलग्न उपजीविका उपक्रम राबविण्यात मोठे यश मिळवले आहे. परंतु त्यांना चांगली बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी MSRLM ने बिगरशेती आणि विपणन क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्यास सुरुवात केली आहे. स्व-उत्पादनांना बाजारपेठ जोडण्यासाठी विविध कार्यक्रमांच्या मदतीने वेगवेगळे उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. शेती, शेती संलग्न आणि बिगरशेती उपक्रमात बनवलेली सर्व उत्पादने बाजारपेठेत "UMED" या नावाअंतर्गत ओळखली जातात. हे सर्व साध्य करण्यासाठी अनेक प्रकल्प कार्यक्रमांनी योगदान दिले जे खाली नमूद केले आहेत.

## 1. ग्रामीण उद्योजकता विकास कार्यक्रम (SVEP)

SVEP चे एकंदर उद्दिष्ट ग्रामीण भागात स्वयं रोजगार सुरु करुन आर्थिक चालना देण्यासाठी सरकारच्या प्रयत्नांची अंमलबजावणी करणे. त्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरीबी आणि बेरोजगारी कमी करणे हा आहे.

SVEP (Start-up Village entrepreneurship Program) हा प्रकल्प माननीय वित्तमंत्री केंद्रशासन यांनी ग्रामीण महिलांना उद्योग करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी या प्रकल्पाची घोषणा केली. SVEP या कार्यक्रमांमध्ये उद्योग किंवा व्यवसाय करणारा युवक व नवीन उद्योग चालू करू इच्छिणाऱ्यांना योग्य प्रकारे प्रशिक्षण व व्यवसायासाठी निधी दिला जातो. त्याचबरोबर व्यवसायवृद्धीसाठी देणाऱ्या समूह साधन व्यक्ती निवडून त्यांना प्रशिक्षित केले जाते. तसेच तालुका व्यवसाय साधन केंद्र उभारून ते महिला समूहाद्वारे चालवले जात आहे.

पहिल्या टप्प्यात सोलापूर जिल्ह्यातील बार्शी आणि मोहोळ या दोन तालुक्यामध्ये हा प्रकल्प २०१६ मध्ये चालू झाला आहे. सद्यस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील ४५०० उद्योगांना सदर योजने अंतर्गत पाठबळ देण्यात आले आहे

राज्यात SVEP प्रकल्प हा चौथ्या टप्प्यात ठाणे जिल्ह्यातील शहापूर, पालघर जिल्ह्यातील पालघर, यवतमाळ जिल्ह्यातील कळंभ व केळापूर व जालना जिल्ह्यातील जालना व भोकरदन या नवीन 6 तालुक्यात 2019 मध्ये चालू झाले.

## 2. अजीविका ग्रामीण एक्सप्रेस योजना (AGEY)

AGEY चे मुख्य उद्दिष्ट SHG च्या सदस्यांना DAY - NRLM अंतर्गत सुरक्षित, परवडणारी आणि सामुदायिक देखरेखीखाली ग्रामीण वाहतूक सुविधेद्वारे उपजीविकेचे पर्याय उपलब्ध करून देणे आणि दुर्गम भागांना महत्त्वाच्या सेवा आणि सुविधांनी जोडणे हा आहे. MSRLM ने मार्च 2021 पर्यंत 63 वाहने वितरीत केल्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांचा फायदा होत आहे.

## 3. NRETP - OSF

राष्ट्रीय ग्रामीण आर्थिक परिवर्तन प्रकल्प अंतर्गत नॅनो उद्योगांना पाठबळ मिळण्याकरिता उद्योग विकास केंद्र (OSF) यांची स्थापना करण्यात आली आहे . सदर केंद्रा द्वारे महाराष्ट्रातील 55 तालुक्यातील जुन्या आणी नवीन सूक्ष्म व लघु उद्योगांना ,उद्योग व उद्योजकता विकाससाठी तालुका व प्रभागस्तरावर विविध (वित्तीय /तांत्रिक ) सेवा पुरवण्यात येत आहेत. व्यवसाय जोडणी, बाजारपेठ बांधणी, तांत्रिक सहाय्य इत्यादी बाबतच्यासुविधा ह्या मध्ये समविष्ठा आहे .

सदर सुविधा देण्या करिता २७० BDSP ( Business Development Support Persons), ११०Mentors,९०Facilitators ह्या Cadre ला तयार करण्यात आले आहे.महाराष्ट्रातील एकूण १२५७८ उद्योगांना योजना काळामध्येसहकार्य देण्याकरिता निवड करण्यात आली आहे. सदर उद्योगांना पाठबळ देण्याकरिता प्रत्यक OSF करिता निवडलेल्या NODAL CLF च्या OSF खात्यामध्ये रु ५० लक्षइतका निधि वितरित करण्यात आला आहे.सदर प्रकल्पांतर्गत १२५८८ उद्योगांना सहाय्य करण्यात येणार आहे .

## 4. क्लस्टर्स – CLUSTERS

NRETP क्लस्टर डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत MSRLM मध्ये कोल्हापुरी चप्पल, पैठणी साड्या आणि बंजारा आर्टिक्राफ्ट्स क्लस्टरसाठी संभाव्य उत्पादक गट विकसित करण्याच्या प्रक्रियेत आहे. त्याचबरोबर कुंभारकाम, कपडे, वारली पेंटिंग आणि सोलर पॅनल्स क्लस्टरसाठी इतर आर्थिक सामंजस्य कराराद्वारे मदतीचा हात देत आहे. हे क्लस्टर महाराष्ट्राच्या कला आणि परंपरांना उजाळा देत आहेत.

## 5. विपणन उपक्रम – MARKETING ACTIVITIES

MSRLM ने सर्व जिल्ह्यांमध्ये मार्केटिंग आउटलेट्सवर काम केले आहे, ग्रामीण हाटची स्थापना केली, उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी ब्लॉक, जिल्हा आणि राज्य स्तरावर विविध प्रदर्शने आणि सरस आयोजित केले आहे. स्वायम सहायता बचत गटांनी बनवलेल्या उत्पादनांना बाजारपेठेत सर्वोत्कृष्ट दर्जा मिळविण्यासाठी उत्पादन विकास आणि उत्पादनांना लागणारे योग्य परवाना देण्याची प्रक्रिया नियमित चालू आहे.

## कृतिसंगम विभाग

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागातंर्गत, उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान सन 2011 पासून राज्यातील ग्रामीण भागातील गरीब व वंचित कुटूंबातील महिलांसाठी काम करत आहे. अभियानाच्या कृतीसंगम (Convergence) विभागामार्फत महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून ग्रामीण कुटूंबांच्या समृद्धीसाठी अभियानात विवीध उपक्रम राबविले जात आहेत. ग्रामीण महिलांचे आरोग्य, पोषण व स्वच्छता, शिक्षण , पंचायतराज संस्थामधील सहभाग, शासनाच्या विविध योजनांमधील सहभाग तसेच त्यांच्या कुटूंबांमध्ये उपजिवीकेचे शाश्वत स्त्रोत विकसीत करण्यासाठी इतर विभागासोबत कृतीसंगम करुन शाश्वत उपजिवीकेचे साधन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. अभियानाच्या माध्यमातून स्वयंसहाय्यता समुहांतील महिलांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात येत असून त्याकरीता शासनाच्या विवीध योजनांचा लाभ महिलांना मिळवून देण्यावर भर देण्यात येतो. अभियानांतर्गत अभियानाच्या सहाय्याने व इतर शासकीय योजनांचा लाभ घेवून शेती आधारीत व्यवसायाशी 32 लक्ष कुटूंबे जोडली गेलेली आहेत तर बिगर शेती अधारीत 87000 उद्योग सुरु आहेत. कृतीसंगम विभागामार्फत ग्रामीण महिलांना ईतर शासकीय विभाग जसे कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, समाज कल्याण विभाग, मानव विकास

मिशन, आवास योजना, आरोग्य विभाग, महिला बाल विकास विभाग इत्यादी शासकीय विभागातील योजनेचा लाभ महिलांना मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतो. कृतीसंगम विभागातंर्गत प्रामुख्याने विविध योजनेची अंमलबजावणी करण्यात येते.

## 1) प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME)

आत्मनिर्भर भारत पैकेज अंतर्गत केंद्र शासन सहाय्यीत प्रधान्नमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग (PM Formalization of Micro Food processing Enterprises (PMFME) ही महत्त्वकांक्षी योजना 2020 ते 2025 या कलावधीत राबविण्यात येत आहे. ग्रामीण विकास मंत्रालय (MoRD), भारत सरकार व खाद्य प्रसंस्करण उद्योग मंत्रालय (MoFPI), भारत सरकार यांच्यामध्ये PMFME योजनेअंतर्गत सर्व राज्यामधील राज्य ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत (SRLM) स्थापित करण्यात आलेल्या स्वयं सहाय्यता समूहामधील अन्नप्रक्रिया उद्योगांना बळकटीकरण करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्यात कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ही नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहेत. PMFME योजनेअंतर्गत खालील मुख्य घटकांची जिल्ह्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. 1) अन्न प्रक्रिया उद्योगात समाविष्ट उद्योजकांना बिज भांडवलाचे वितरण 2) अन्न प्रक्रिया उद्योगाच्या विस्तारीकरणासाठी 35% क्रेडिट लिंक सबसिडी 3) सामाईक पायाभूत सुविधा केंद्र (CIF- Community Infrastructure Facility Centre) 4) मार्केटिंग व ब्रांडिंग. योजनेअंतर्गत NRLM अंतर्गत स्वयं सहाय्यता समुहातील महिला ज्या अन्न प्रक्रिया उद्योगात समाविष्ट उद्योजकांना रक्कम रु. 40000/- बिज भांडवल देण्यात येते. PMFME योजनेअंतर्गत अन्नप्रक्रिया उद्योगामधील किमान 1 ते कमाल 10 सदस्यांना प्रती सदस्य रक्कम रु. 40,000/- ते रक्कम रु. 4,00,000/- पर्यंत बिज भांडवल देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. PMFME योजनेतील इतर घटकाच्या माहितीसाठी www.pmfme.mofpi.gov.in या संकेत स्थळाला भेट द्यावी.

## 2) अन्न, आरोग्य, पोषण व स्वच्छता (FNHW) -

उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत 34 जिल्ह्यातील 351 तालुक्यामध्ये अन्न, आरोग्य, पोषण आणि स्वच्छता (FNHW) उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. स्वयं सहाय्यता समुहातील महिलांच्या उपजिवीकेसोबतच त्यांची व त्यांच्या कुटुंबीयांची पोषणाची आणि आरोग्याची स्थिती सुदृढ रहावी यावर भर देण्यात येतो. ग्रामीण महिला, गरोदर स्त्रिया, स्तनदा माता, लहान बालके व किशोरवयिन मुली यांचा आहाराचा दर्जा सुधारणे, कुपोषनाचे प्रमाण कमी करने तसेच महिलांमधील असलेल्ल्या अनिमियाँचे प्रमाण कमी करण्यासाठी गवस्तरावर कार्यरत असलेल्ल्या CTC मार्फत जनजागृती करण्यात येते. तसेच FNHW अंतर्गत स्वयं सहाय्यता समुहातील महिलांना पोषक तत्वांनी युक्त सेंद्रिय भाजीपाला घरच्या घरी उपलब्ध होन्याकारिता व उत्पन्नाचे आर्थिक साधन उपलब्ध होन्यासाठी वैयक्तिक उमेद पोषण परसबागा तयार करण्यात येतात.

## 3) आदिम जमाती विकास कार्यक्रमाअंतर्गत मंजूर ESTABLISHMENT OF BACKYARD POULTRY FOR PVTG FAMILIES -

जिल्हा ठाणे व पालघर येथे आदिम जमाती विकास कार्यक्रमाअंतर्गत मंजूर Establishment of Backyard Poultry For PVTG Families ही योजना राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत पालघर जिल्ह्यातील दहाणु तालुक्यात 611 लाभार्थी व ठाणे जिल्ह्यातील शहापुर तालुक्यात 446 लाभार्थी यांना लाभ द्यावयाचा आहे. कार्यक्रमाअंतर्गत लाभार्थ्यांना 4 आठवडे वयाची प्रती लाभार्थी 50 देशी कोंबड्याची पिल्ले व त्याकरीता अनुषंगिक बाबींचा पुरवठा करण्यात येतो. सदर योजनेच्या माध्यमातून आदिम जाती जमातीतील महिलांना उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देणे व त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ करणे यावर भर देण्यात येतो.

## कौशल्य

*ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षणसंस्था(RSETI)*

ग्रामीण भागातील १८ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींनास्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षणसंस्था(RSETI) ही योजना उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती मार्फत राबविली जाते. सदर योजनेकरीता १००% निधी केंद्र शासनामार्फत दिला जातो.

आरसेटी ही योजना सन २००९ मध्ये केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाद्वारे सुरु करण्यात आली. आरसेटीची संकल्पना ही कर्नाटक येथे श्री. क्षेत्र धर्मस्थळ एज्युकेशनट्रस्ट यांच्यातर्फे राबविलेल्या(RUDSETI) यावरआधारीत आहे.महाराष्ट्र राज्यात एकुण ३४ RSETI व एकRUDSETI आहे. ७ राष्ट्रीयकृत बँकांमार्फत सदरRSETI योजना राबविली जाते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

*BANK WISE RSETIS ARE AS UNDER :*

- • Bank of Baroda – 01
- • Bank of India - 11

- • Bank of Maharashtra – 07
- • Central Bank of India - 06
- • IDBI – 01
- • State Bank of India - 08
- • RUDSETI – 01
- **Total - 35**

या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील युवकांना स्वयंरोजगारासाठी १० ते ४५ दिवसांचे कृषिविषयक प्रशिक्षण, प्रक्रिया उद्योग विषयक प्रशिक्षण व सामान्य उद्योजकता प्रशिक्षण असे विविध व्यवसायांचे (शेती व बिगर शेती) मोफत व निवासी प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर लाभार्थ्यांना उद्योगव्यवसाय सुरु करणेसाठी बँकांमार्फत कर्ज पुरवठा करणेसाठी सहाय्य केले जाते. प्रशिक्षण केंद्रचालविण्याची पुर्ण जबाबदारी त्या-त्या जिल्ह्यातील Lead Bank कडे सोपविण्यात आलेली आहे.

सन २०२१-२२ करीता एकुण १८९७२ लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट प्राप्त होते. त्यापैकी १९६०६ लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे आणि एकुण १५२३२ स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. स्वयंरोजगार Self Finance, Bank Finance आणिWage Employment या३ पद्धतीने ग्राह्य धरला जातो.

सन २०२२-२३ करीता एकुण २७२४२ लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट प्राप्त असून माहे मे २०२२ अखेर एकुण ३०२१ लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.